नोंदणी क्र. : एस ६८५/१९४९-५०

# अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सोलापूर.

● जिल्हा कार्यालय : शिवस्मारक संकुल, शिंदे चौक, नवी पेठ, सोलापूर - ४१३००१ ●
● संपर्क : ८४१२०९८११७, ९५९५९५०५२७, ८४२१५६१७२७ ●
● Email : ...r@gmail.com ●

Punyashlok Ahilyadevi Holkar
Solapur University, Solapur.
Inward No. 1754
- 2 MAR 2020
Asst. Registrer Dy. Registrar AR & D

जा.क्र. : अभाविप/सो/३०

दिनांक : ०१/०३/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य

विषय :- DIPEX 2020 राज्यस्तरीय तांत्रिक प्रकल्प प्रदर्शनाला भेट देण्या बाबत......

महोदय,

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद 9 जुलै 1949 पासून गेली 70 वर्षे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात अविरतपणे कार्य करीत आहे. स्वामी विवेकानंदांना आदर्श मानून व त्यांच्या विचाराने कार्य करणारी अभाविप जगातील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना म्हणून ओळखली जाते. गेली 70 वर्षे विद्यार्थी परिषदेने आपल्या कार्याच्या, कार्यक्र--माच्या व कार्यकर्त्यांच्या माध्यमातून समाजात एक वेगळा ठसा उमटवला आहे.

अशाच विविध कार्यक्रमांपैकी एक कार्यक्रम म्हणजे DIPEX होय. 1986 साली सांगली शहरातून छोट्याश्या स्वरूपामध्ये सुरु झालेले प्रदर्शन आज DIPEX च्या माध्यमातून समाजात भव्यदिव्य स्वरूपात आले आहे. अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, पदव्युत्तर विज्ञान, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व कृषी यांमध्ये शेवटच्या वर्षात शिकत असणारे विद्यार्थीना जो प्रकल्प करावयाचा असतो त्या प्रकल्पाचे राज्यस्तरीय प्रदर्शन म्हणजे DIPEX होय. DIPEX चे मुख्य आयोजक अभाविप व सृजन ट्रस्ट असतात. DIPEX मध्ये महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयातून साधारणता 1000 प्रकल्प येतात. त्यापैकी निवडक २०० ते २५० प्रकल्पाचे चार दिवसाचे प्रदर्शन असते. आजपर्यंत भारताचे पूर्व राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम, डॉ.विजय भटकर, स्व.प्रमोद महाजन इत्यादी विद्वान व्यक्तींनी DIPEX ची पाहणी व कौतुक केले आहे. यावर्षीचे ३१ वे DIPEX दिनांक ६ ते ९ मार्च २०२० दरम्यान संगमेश्वर महाविद्यालय मैदान येथे होणार आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या सर्वात मोठ्या तांत्रिक महोत्सवात आपणही सहभागी व्हावे.

तरी आपण या भव्य राज्यस्तरीय तांत्रिक प्रदर्शनाचा लाभ आपल्या विध्यार्थ्यांना देऊन आपण हे प्रदर्शन पाहण्यासाठी यावे आम्ही आपले स्वागत करण्यास सज्ज राहू.

सहकार्याच्या अपेक्षेसह धन्यवाद !!!

आपले,

प्रा.डॉ.राज बागेवाडी
महानगर अध्यक्ष, प्रदेश उपाध्यक्ष

सुरज पावसे
महानगर मंत्री

सूचना
कृपया ह्या प्रदर्शनास भेट देण्या पूर्वी पुढील नंबर वरती फोन करावा. ८४१२०९८११७ ७७४५८८९०६०

---

जा. क्र. पुअहोसोविसो/2019-20/3226

दिनांक : 2 MAR 2020

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर.

विषय :- DIPEX २०२० राज्यस्तरीय तांत्रिक प्रकल्प प्रदर्शनाला भेट देण्याबाबत...

संगमेश्वर महाविद्यालय मैदान, सोलापूर येथे दि. ०६ ते ०९ मार्च २०२० रोजी DIPEX २०२० राज्यस्तरीय तांत्रिक प्रकल्प प्रदर्शन आयोजित करण्यात येत आहे. तरी सदर प्रदर्शन पाहण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक, पालकांना आपल्या स्तरावरुन उपस्थित राहण्याबाबत आवाहन करावे व तसेच आपणही प्रदर्शनाला भेट द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

**सहाय्यक कुलसचिव**
**शैक्षणिक, संशोधन आणि विकास**










DIPEX Office : Shivsmarak Sankul , Shinde Chowk, Navi Peth, Solapur

Email : abvpinsolpaur@gmail.com | Contact : 959 595 05 27 | 774 588 90 60


ABVP

SRIJAN
DIPEX CENTRE FOR
ENTREPRENEURSHIP DEVELOPMENT




# DIPEX 2020

For The Students Of Maharashtra & Goa

A State Level Project Exhibition Cum Competition For
Polytechnic | Engineering / Technology | Agriculture (Sciences)

## 6th to 9th March 2020

**Sangameshwar College Ground,
VIP Road , Solapur.**

f DIPEX | dipex2020 | DIPEX | DIPEX2020 | dipex@srijan.org.in

In Association With

# डिपेक्स

**राज्यस्तरीय अभियांत्रिकी प्रकल्प प्रदर्शन व स्पर्धा**

**▪ तंत्रशिक्षण ▪ अभियांत्रिकी ▪ पदवृत्तर शास्त्र ▪ कृषी**

डिपेक्स म्हणजे राज्यस्तरीय प्रकल्प प्रदर्शन व स्पर्धा. तंत्रशिक्षण, ॲग्रीकल्चर आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी १९८६ पासून अविरतपणे आयोजित केली जाणारी स्पर्धा आहे. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व्यासपीठ आणि संधी उपलब्ध करून देण्याचे काम गेली अनेक वर्षे अभाविप करत आहे. त्यातुन विद्यार्थ्यांना अनेक नामवंत उद्योजक, शिक्षणतज्ञ आणि समाजातील अनेक घटकांसमोर संवाद साधण्याची संधी मिळते. प्रकल्प अणि स्पर्धा इतकाच उद्देश न ठेवता डिपेक्स विद्यार्थ्यांमधील नवउद्योजकाला प्रत्यक्ष पाठबळ आणि मदत करण्याचे काम करते.

२५० हुन अधिक प्रकल्प   १०००+विद्यार्थी सहभाग   अनेक मान्यवरांच्या भेटी

# दृष्टी

सृजन विद्यार्थ्यांमध्ये समस्या निराकरणाचा आत्मविश्वास व दृष्टिकोन निर्माण करण्याचे काम करते, तसेच ज्ञानाची उपयोजिता उपलब्ध करून देते. सृजन विद्यार्थ्यांना शिक्षण तसेच व्यावसाय निवडीच्या बाबतीत सक्षम बनविते. १९९६ पासून सातत्याने डिपेक्स मार्फत सृजन विद्यार्थ्यांना स्वदेशी, स्वनिर्मित प्रकल्प जे समाजातील सर्व घटकांना आर्थिकदृष्टया परवडतील असे विविध प्रकल्प निर्मितीसाठी सहाय्य करीत आहे आणि डिपेक्स हे अत्यंत महत्वपूर्ण व्यासपीठ आहे. उद्योजक निर्मिती हा सृजनचा ध्यास आहे.

31

DIPEX 2020

# सृजन

१९९६ मध्ये स्थापन झालेली सृजन हि एक संस्था आहे. डिपेक्स च्या माध्यमातून उद्योजक निर्मिती मध्ये तर्क सुसंगत जबाबदारी घेऊन काम करत असते. सृजन उद्योग निर्मितीला मार्गदर्शन तसेच नवउद्योजक विशेषतः अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे महत्वपूर्ण कार्य करते. डिपेक्स हे अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना तसेच नवउद्योजकांना एक राज्यस्तरीय व्यासपीठ आहे.

# ध्येय

विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेल्या ज्ञानाचे समाजोपयोगी वापर कसा होईल यासाठी सृजन सातत्यपूर्ण प्रयत्न करते.